16 APR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सुरेंद्र जोंधळे : शिवाजी विद्यापीठात 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताहाचा समारोप

# बाबासाहेबांना मूल्याधारित जीवनशैली अभिप्रेत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाही म्हणजे केवळ शासनव्यवस्था नव्हे, तर नागरिकांची मूल्याधिष्ठित जीवनशैली आणि त्यामधील सामाजिक नैतिकता व बुद्धिप्रामाण्यवाद अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार' विषयावर विचार मांडले. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात गुरुवारी ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी विचार मांडले.

डॉ. जोंधळे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा 'एक व्यक्ती, एक मूल्य' हा प्रवास आपल्याला घटनात्मक नैतिकतेच्या जोपासनेतून पूर्ण करावयाचा आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, आत्मप्रतिष्ठा व व्यक्तीचे अबाधित हक्क या तीन बाबी राजकीय लोकशाहीमध्ये बाबासाहेबांना अभिप्रेत होत्या. त्यात व्यक्तीचे सार्वभौमत्व हे सामायिक असल्याखेरीज खरी लोकशाही अस्तित्वात येणार नाही.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत लोकशाहीच्या विचारांपासून व त्यांच्या अंमलबजावणीपासून आपण किती जवळ अथवा किती दूर आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याचा हा कालखंड आहे. संविधानिक मूल्ये जपण्याची आणि जोपासण्याची आज कधी नव्हे इतकी गरज निर्माण झाली आहे. या कार्यक्रमास जी. आर. पळसे, पी. एन. वासंबेकर, भारती पाटील, पी.एस. कांबळे, निखिल गायकवाड, आर.जी. सोनकवडे, भरत नाईक, अभय जायभाये, आदी उपस्थित होते. डॉ. एस.एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

## वक्तृत्व स्पर्धेतील विजेते

फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रातर्फे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रसाद लोखंडे, तेजस्विनी पांचाळ, प्रीती हेगडे, कैलास मेहाडा, ऋषिकेश घाटुगडे (पदवी गट), विदिरा विभुते, संकेत पाटील, गुरुराज रसाळ, इंद्रजा गोरे, श्रुती कांबळे, शुभांगी माने (पदवीत्तर गट) विजेते ठरले. त्यांना प्रमुख उपस्थितांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

लोकमत



मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने प्रा. डॉ. रमेश जाधव यांचा रत्नागिरी येथील समारंभात जीवनगौरव पुरस्काराने सन्मान केला. यावेळी डॉ. नारायण कांबळे, डॉ. एस.एन. पवार, स्मिता जाधव, प्र कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

# जीवनगौरव पुरस्काराने रमेश जाधव सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. रमेश जाधव यांचा मराठी समाजशास्त्र परिषदेकडून राष्ट्रीय स्तरावरील 'जीवनगौरव' पुरस्काराने गौरव करण्यात आला. रत्नागिरी येथे झालेल्या समारंभामध्ये डॉ. जाधव यांनी पत्नी स्मिता जाधव यांच्यासह हा पुरस्कार स्वीकारला.

परिषदेच्या वतीने अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील अतुलनीय आणि महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा मानला जाणारा हा जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. डॉ. जाधव यांच्या आतापर्यंतच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार रत्नागिरी येथील गोगटे जोगळेकर महाविद्यालयात झालेल्या समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. एस. एन. पवार, शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे, सचिव डॉ. वेदप्रकाश मलवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात आज साहित्य चर्चेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने गो. मा. पवार यांच्या स्मृतीदिनानिमित्त शनिवार (दि. १६) रोजी सकाळी ११.३० वाजता वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी सभागृहात 'गो. मा. पवार : व्यक्ती आणि विचार' या विषयावर साहित्य चर्चेचे आयोजन केले आहे. साहित्य चर्चेत प्राचार्य डॉ. संतोष कोटी, डॉ. अशोक बाबर, प्रा. अविनाश सप्रे सहभागी होणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील, अशी माहिती प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

सकाळ



**रत्नागिरी : येथे मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे डॉ. जगन कराडे यांना पुरस्कार प्रदान करताना डॉ. पी. जी. जोगदंड. शेजारी प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी, परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे.**

# मराठी समाजशास्त्र परिषदेकडून डॉ. कराडे यांना दोन पुरस्कार

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांना मराठी समाजशास्त्र परिषदेचे दोन पुरस्कार मिळाले आहेत. रत्नागिरी येथे पुरस्कार प्रदान सोहळा झाला.

मराठी समाजशास्त्र परिषदेने या वर्षापासून महाराष्ट्रातील समाजशास्त्र या विषयात शैक्षणिक भर घालणाऱ्या प्रा. डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ट संशोधक/ प्राध्यापक पुरस्कार तसेच आय.सी.एस.एस.आर. आणि विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत संशोधक ग्रंथास डॉ. सूर्यकांत घुगरे संशोधक ग्रंथ पुरस्कार देण्यात येत आहे. पहिल्या पुरस्कारासाठी स्वतः डॉ. कराडे तर दुसऱ्या पुरस्कारासाठी त्यांचे 'ऑक्युपेशनल मोबीलिटी अमंग शेड्युल्ड कास्ट' पुस्तक पात्र ठरले.

परिषदेचे ३१वे राष्ट्रीय अधिवेशन रत्नागिरीच्या आर. टी. गोगटे कला व विज्ञान आणि आर. व्ही. जोगळेकर वाणिज्य महाविद्यालयात झाले. डॉ. कराडे यांना ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. पी. जी. जोगदंड यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले. प्राचार्य डॉ. पी.पी. कुलकर्णी, परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे उपस्थित होते.

डॉ. कराडे यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर बारा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले. यातील दोन ग्रंथ केंब्रिज स्कॉलर पब्लिकेशन, लंडन येथून प्रकाशित झाले.

सकाळ

# विलास संगवे हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ : डॉ. परमजितसिंग जज्ज

कोल्हापूर, ता. १५ : 'डॉ. विलास संगवे हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ होते,' असे मत प्रा. डॉ. परमजितसिंग जज्ज यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले होते. भारतीय समाजशास्त्र संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. जज्ज यांनी 'प्रबोधन, तर्कसंगतता आणि समाजशास्त्राचा उदय : पुराणमतवादी प्रतिक्रिया समजून घेणे' यावर व्याख्यान दिले.

प्रबोधन आणि तर्कसंगतता यांच्या संगमातून समाजशास्त्राचा उदय कसा झाला, यावर डॉ. जज्ज यांनी प्रकाश टाकला. समाजशास्त्राच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, ''समाजाचे प्रश्न सोडविणे आणि धोरणे ठरवण्यामध्ये सामाजिक शास्त्रज्ञांची भूमिका महत्त्वाची आहे. डॉ. संगवे यांनी शाहू महाराजांच्याविषयी केलेले संशोधन मोलाचे आहे. तरुण संशोधकांनी डॉ. संगवे यांच्या कार्यापासून प्रेरणा घ्यावी.''



डॉ. परमजितसिंग जज्ज

प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, समाजशास्त्राचे माजी विभागप्रमुख डॉ. एस. एन. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. स्वागत विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रतिमा पवार यांनी करून दिली. सूत्रसंचालन अभिजित पाटील, आकाश ब्राह्मणे यांनी केले. आभार डॉ. पी. बी. देसाई यांनी मानले. माजी विभागप्रमुख डॉ. आर. बी. पाटील, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. एस. एल. गायकवाड उपस्थित होते.